# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरुवार, दिनांक १८ एप्रिल, २०१३.

## (सकाळी १०.०० ते दुपारी १२.१५ वाजेपर्यंत)

**म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव - (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर) -**

**सर्वश्री. विनोद तावडे,** दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, चंद्रकांत पाटील, डॉ.दिपक सावंत, श्री.सुमंतराव गायकवाड, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री.विजय गिरकर, रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, डॉ.रणजीत पाटील, ॲड.अनिल परब, श्री.भगवान साळुंखे, **वि.प.स. यांचा अंतिम आठवडा प्रस्ताव -**

"सन २००२ पासून अनुसूचित जातीच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा अनुशेष हजारो कोटीपर्यंत गेल्याचे निदर्शनास येणे, गत काही वर्षातील प्रमुख लेखाशीर्षामधील शेकडो कोटी रूपयांची रक्कम अखर्चित राहिल्याने अनुसूचित जातीचे बांधव विकासापासून वंचित राहणे, सन २०१२-१३ मध्ये देखील बऱ्याचशा योजनांमधील ५० टक्क्यापेक्षा अधिक रक्कम अखर्चित असल्याचे निदर्शनास येणे, अनुसूचित जातीच्या बांधवांना दारिद्रय रेषेच्यावर आणावे, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या हेतूने महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळ मर्यादित व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित या राज्य शासनाच्या उपक्रमाची स्थापना करण्यात येणे, परंतू या महामंडळातील योजनांचा लाभ केवळ जवळच्या कार्यकर्त्यांनाच देण्यात आल्याने अनुसूचित जातीतील गरीब बांधव या योजनांपासून वंचित राहणे, मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था, महार वतनांच्या जमिनीचा सुध्दा काही विशिष्ट व्यक्तिंनी स्वहितासाठी वापर केल्याने अनुसूचित जातीच्या कोट्यवधी बांधवांमध्ये पसरलेला तीव्र स्वरूपाचा असंतोष, त्याचप्रमाणे अनुसूचित जमातींच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या व्यवसायांमध्ये भ्रष्टाचार झाल्याचे उघडकीस येवूनही दोषी कंत्राटदार व अधिकाऱ्यांना शासनाकडून संरक्षण मिळाल्याचे निदर्शनास येणे, भ्रष्टाचारामुळेच आदिवासी बांधव आजही विकासाच्या मार्गापासून वंचित असल्याने त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, तसेच अर्थसंकल्पामध्ये बेदखल कुळांच्याबाबतीत कोणतीही तरतूद न करणे, त्याचप्रमाणे, कोकण प्रदेश विकासाकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, सन २००९ मधील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घोषित केलेल्या कोकण विकास पॅकेजमध्ये १९०० कोटी रूपयांची रक्कम अद्यापही अखर्चित असणे, तसेच अनेक निसर्गरम्य ठिकाणे, जागतिक पातळीवर स्पर्धा करू शकतील असे स्वच्छ

समुद्र किनारे कोकणाला लाभुनही अर्थसंकल्पात कोकणाला आवश्यक तो निधी न मिळाल्याने कोकणातील पर्यटनाचा विकास रखडलेला असणे, अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद न केल्याने सिंचन, कृषीपंप, रस्ते, इ. च्या अनुशेषामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने संपूर्ण कोकणातील जनतेमध्ये तीव्र स्वरूपाचा असंतोष, या प्रकरणी शासनाने करावयाची कारवाई व याबाबतची शासनाची भूमिका विचारात घेण्यात यावी."

## (दुपारी १२.३० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(अ)** मा.सभापतींच्या निदेशानुसार मंगळवार, दिनांक १६ एप्रिल, २०१३ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला श्री.संजय दत्त, श्री.सुभाष चव्हाण, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३८४१५ "सुपर स्पेशालिटी रुग्णालय (जि.अमरावती) येथील सरकारी अनुदानाचा गैरफायदा घेणाऱ्या डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत"

**(ब)** "नाशिक येथील जय आनंद अनाथ बालकाश्रमातील मुलींचे शोषण होत असल्याबाबत" या विषयावरील डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा अल्पसूचना प्रश्न क्रमांक ४१५२२.

**(क)** **तारांकित प्रश्न.**

**(ड)** **तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **मुख्यमंत्री** : "राज्यातील विविध शहरात परवडणाऱ्या घरांसाठी भागीदारी तत्वावर पुनर्विकास प्रकल्प राबविण्याच्या निर्णयाबाबत." या विषयावरील श्री.रामदास कदम, श्री.दिवाकर रावते, श्री.प्रकाश बिनसाळे, डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३०६७० ला दिनांक १८ जुलै, २०१२ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तरांच्यावेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(२) **पर्यटन मंत्री** : "सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटन विकासाबाबत टाटा कन्सल्टन्सीने शासनास सादर केलेल्या ३६५ कोटी रुपयांच्या आराखडयाबाबत" या विषयावरील मेजर सुधीर सावंत, श्री.अनंत तरे, माजी वि.प.स.

यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ५०६४ ला दिनांक ५ एप्रिल, २००५ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तरांच्यावेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(३) **मत्स्यव्यवसाय मंत्री** : "सिंधुदुर्ग जिल्ह्यात परप्रांतीय मच्छिमार ट्रालर्सकडून वेंगुर्ला, शिरोडा, वेळागर, तिवती या ठिकाणी घुसखोरी झाल्याबाबत" या विषयावरील श्री.रामदास कदम, डॉ.दिपक सावंत, श्री.सुभाष चव्हाण, श्री.चरणसिंग सप्रा, वि.प.स. व श्री.परशुराम उपरकर, श्री.राजन तेली, माजी वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक १२७८२ ला दिनांक ७ एप्रिल, २०११ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तरांच्यावेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(४) **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** : "बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ शहरातून बाहेर जाणाऱ्या रस्त्याच्या चौपदरीकरणाबाबत" या विषयावरील श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३४१६३ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१२ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार पाहणी अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(इ) **अतारांकित प्रश्नोत्तरांची बारावी, तेरावी, चौदावी, पंधरावी व सोळावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे -**

(१) **मुख्यमंत्री** : " महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ या अधिनियमामध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१० (सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० ) च्या कलम १३ च्या पोट-

कलम (१) अन्वये शासनाने निर्गमित केलेले आदेश क्रमांक टिपीएस- १८१२/प्र.क्र.२९९ / १३ /नवि-१३, दिनांकित १ एप्रिल, २०१३" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उप मुख्यमंत्री** : "भारताचे नियंत्रण व महालेखापरिक्षक यांचे सन २०११-२०१२ या वर्षाचे (१) वित्तीय लेखा अहवाल (खंड एक व दोन), (२) विनियोजन लेखा अहवाल, (३) सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवाल, (४) राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवाल, (५) महसुली जमावर अहवाल, (६) सार्वजनिक उपक्रम अहवाल, (७) आर्थिक क्षेत्र अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(३) सामाजिक न्याय मंत्री** : **(अ)** "महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २००८-२००९ व २००९-२०१० या वर्षांचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ब)** "महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २००६-२००७, २००७-२००८ व २००८-२००९ या वर्षांचा अनुक्रमे तीसावा, एकतीसावा व बत्तीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : "विधानपरिषदेने संमत केलेल्या विधेयकाला विधानसभेची संमती व दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचे जाहीर करण्यात येईल."**

**चार : अनुसूचित जाती कल्याण समितीचा तिसरा अहवाल सादर करणे.**

**पाच : उपविधान समितीचा तिसरा अहवाल सादर करणे.**

**सहा : विनंती अर्ज सभागृहास सादर करणे -**

श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा कोकणातील विशेषत: रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग

जिल्ह्यातील कुणबी समाजातील शेतकऱ्यांवर होत असलेला अन्याय या विषयावरील विनंती अर्ज सादर करणे.

**सात : (अ) म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदने - (असल्यास).**

**(ब) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेची आश्वासित माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**मुख्यमंत्री** : "मिठी नदी सफाईचे काम युध्द पातळीवर करण्याची गरज" या विषयावरील श्री.मधु चव्हाण, माजी वि.प.स. व इतर वि.प.स. यांनी दिनांक १८ मार्च, २००६ रोजी उपस्थित केलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेवरील निवेदनावेळी दिनांक १९ एप्रिल, २००६ रोजी दिलेल्या आश्वासनानुसार आश्वासित माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**आठ : (अ) लक्षवेधी सूचना - (म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

(१) **श्रीमती अलका देसाई,** सर्वश्री. संजय दत्त, सुभाष चव्हाण **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मुंबई महापालिकेने हाती घेतलेल्या विकास आराखड्यात सुमारे ९७३ एकर जमिनीवरील तिवरे व पुळणीची ठिकाणेच नाहीशी झाली असल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, तिवरांच्या बेसुमार कत्तलीमुळे २६ जुलै, २००५ च्या पावसात मिठी नदीला आलेला प्रलय लक्षात घेऊनही विकास आराखड्यात वने, पुळण, समुद्रकिनारे, तिवरे यांच्या जागांची अचूक नोंद केली न जाणे, मुंबई महानगरपालिकेने ज्या परदेशी कंपनीवर हे विकास आराखडा बनविण्याचे काम सोपविले आहे त्यांनी तिवरांना नकाशावरुन हद्दपार करणे, सीआरझेडची नियमावली, पाणथळ नकाशे, भारतीय वनविभागाचे सर्वेक्षण याकडे करण्यात आलेले दुर्लक्ष, परिणामी या विकास आराखड्यात अनेक त्रुटी राहिल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिंतेची भावना, शासनाने याबाबत तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. विजय गिरकर,** विनोद तावडे, ॲड. आशिष शेलार**, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" समर्थ मार्केटिंग ॲन्ड कंपनीचे नावे राजीव गांधी व्यापारी संकुल

छत्रपती शिवाजी राजे संकुल गणेशनगर, चारकोप, कांदिवली (प.) येथे कार्यालय चालू करुन विजयसिंह देशमुख यांनी म्हाडाच्या मालाड मालवणी जनकल्याण नगर, भाब्रेकर नगर, मालाड (प) येथील गृहनिर्माण योजनेमध्ये शासन स्वेच्छाधिकार अंतर्गत असलेल्या सदनिका मिळवून देण्याचे आमिष दाखवून सभासदांची लाखो रुपयांची फसवणूक करणे, याकामी महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग आणि म्हाडाची बनावट कागदपत्रे तयार करुन वापरण्यात आल्याचे निदर्शनास येणे, सदर प्रकरणी मुख्य अधिकारी, म्हाडा पणन विभाग यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रार अर्ज करुनही अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नसणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. रमेश शेंडगे,** राम पंडागळे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"एकदंत सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पोस्टल कॉलनी, असगर अली कंपाऊंड, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई या संस्थेच्या कारभाराबाबत संस्थेच्या सदस्यांनी तक्रारी करणे, परिणामी सदर संस्थेवर उपनिबंधक, सहकारी गृहनिर्माण संस्था, म्हाडा/मुंबई यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ (१) अन्वये दिनांक १७ मार्च, २०१२ रोजीच्या आदेशान्वये प्रशासकाची नियुक्ती करणे, असे असूनही नियोजित एकदंत एसआरए संस्थेच्या नावे बनावट संस्था स्थापन करणे, त्यामुळे मूळ सभासदांमध्ये पसरलेले गोंधळाचे व संभ्रमाचे वातावरण, संस्थेचे माजी पदाधिकारी अशोक कारंडे, संदिप रावराणे, सतीश नातु सुतार, एकनाथ भोगले व विकासक सचिन घोलप यांचेविरुध्द प्रशासकांनी वाकोला पोलीस ठाण्यात दिनांक १९ मार्च, २०१३ रोजी तक्रार दाखल करणे, अद्यापही या तक्रारीची पोलिसांनी दखल न घेणे, त्यामुळे मूळ सोसायटीच्या सदस्यांत पसरलेले भीतीचे वातावरण, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

(४) **ॲड. अनिल परब वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"ठाणे जिल्ह्यातील निळजे या गावात प्लॉट देतो असे सांगून विकासकाने आयआयटी कर्मचारी व त्यांचे नातेवाईक अशा एकूण १०३ जणांना सुमारे एक कोटी चार लाख एकावन्न हजार रुपयांना फसविल्याचे नुकतेच उघडकीस येणे, तीन वर्षाचा कालावधी उलटला तरी या घरांचे बांधकाम सुरु झाले नसणे, आपले पैसे परत मिळावे यासाठी कर्मचाऱ्यांनी विकासक तेटमे यांस गाठले असता सदर प्रकल्पासाठी अन्य फायनान्सरच्या शोधात असल्याचे सांगण्यात येणे, पैसे परत देण्यास विकासकाने नकार दिल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेले भीतीचे व घबराटीचे वातावरण, याकडे शासनाने होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री. जयवंतराव जाधव,** विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, ॲड. आशिष शेलार, श्री. रामनाथ मोते **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये प्रचंड प्रमाणात झालेला भ्रष्टाचार, बँकेतील घोटाळे व गैरव्यवहारांच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८९ अ(१) अन्वये विशेष तपासणी पथकाने केलेल्या तपासणीत सदर बँकेच्या संचालक मंडळाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६१ व नियम १९६१ बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९, बँकेचे नोंदणीकृत उपविधींमधील तरतुदी, नाबार्ड व सहकार आयुक्त कार्यालयाने दिलेल्या निर्देशांचे पालन करण्यास जाणीवपूर्वक कसूर केली असल्याचे निदर्शनास येणे, सदर बँकेमध्ये शासनामार्फत प्रशासकाची नियुक्ती करण्याची आवश्यकता, गैरव्यवहारांची रक्कम व अवाजवी खर्चाबाबत जबाबदारी निश्चित करुन सदर रकमा वसूल करण्याबाबत ठोस कार्यवाही करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(६) **सर्वश्री. अनिल भोसले,** जयवंतराव जाधव, किरण पावसकर **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **पर्यावरण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"इलेक्ट्रॉनिक्स वस्तू आणि ई-कचरा निर्माण करणाऱ्या कंपन्यांसाठी केंद्रीय वने आणि पर्यावरण मंत्रालयाने दिनांक १२ मे, २०११ रोजी अधिसूचना काढणे, त्यानुसार इलेक्ट्रॉनिक्स वस्तू निर्माण करणाऱ्या अथवा ई-कचरा

करणाऱ्या कंपनीने ई-कचऱ्याची पुन:प्रक्रिया आणि पुनर्वापर यांची जबाबदारी स्वीकारणे जरुरीचे असणे, ई-कचरा निर्माण करण्यांत मुंबई, पुणे आणि नागपूर ही शहरे अग्रक्रमावर असणे, मात्र, या तीनही शहरात ई-कचऱ्यासाठी कलेक्शन सेंटरचा अभाव असल्याने पर्यावरणाची होत असलेली हानी, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(ब) लक्षवेधी सूचना (म.वि.प. नियम १०१ अन्वये ) संबंधीत निवेदने सभागृहासमोर ठेवणे.**

(या लक्षवेधी सूचनांची सूची जोडपत्राद्वारे वेगळी वितरीत करण्यात येईल.)

**नऊ : म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

**दहा : म.वि.प.नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा - (मंत्र्याच्या उत्तरासहीत एक तास) -**

**सर्वश्री. चंद्रकांत पाटील,** नरेंद्र पाटील, विनोद तावडे, विनायकराव मेटे, भगवान साळुंखे, दिपकराव साळुंखे, हेमंत टकले, संदिप बाजोरिया, अनिल भोसले, प्रकाश बिनसाळे, जयवंतराव जाधव, विक्रम काळे **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतील -

"राज्यातील मराठा समाजाला शिक्षण व नोकरीमध्ये आरक्षण देण्याचा गेल्या ३ वर्षांपासून प्रलंबित असलेला निर्णय, मराठा समाजातील मुलांना चांगले गुण मिळूनही इंजिनियरिंग, मेडिकल, आयआयटीसारख्या क्षेत्रात उच्च शिक्षणाची दारे बंद होणे, सद्य:स्थितीत एकूण ५२ टक्के आरक्षण अनुसूचित जाती-जमाती, भटक्या, इतर मागास, विशेष मागास आदी जातींना दिले असणे, मराठा समाजातील युवकांत बेकारीचे प्रमाणात वाढ होणे, राजर्षी शाहू महाराजांचा जाहीरनामा, ब्रिटीश शासन निर्णय, १९५५ सालचा कालेकर आयोग यांनी मराठा जातीचा समावेश ओबीसीमध्ये केला असणे, मात्र सद्य:स्थितीत राज्य मागासवर्ग आयोगाने अहवाल शासनास सादर करुनही शासनाकडून वेगवेगळ्या समित्यांची नियुक्ती करुन निर्णयाबाबत चालढकल करण्यात येणे, तृतीय अधिवेशन २०१२ दरम्यान उद्योग मंत्री यांची एकसदस्यीय समिती नियुक्त करुन एका महिन्यात मराठा समाजास आरक्षण देण्याची केलेली घोषणा, सदर आश्वासनाचे पालन न झाल्यामुळे राज्यातील मराठा समाजात पसरलेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**अकरा : शासकीय विधयके -**

**(अ) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार खंडश: विचार व संमत करणे -**

सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक १३ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१३.

**क) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विनायक राऊत, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक १३ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक १३ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ब) विधानसभेने संमत केल्यास - विचार खंडशः विचार व संमत करणे -**

**(१)** सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३.

**क) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विनायक राऊत, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.**

**यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(२) " सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक १४ - महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उपसभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) विधेयक, २०१३.

**बारा : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये - (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) श्री.संदिप बाजोरिया व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयातील कर्मचाऱ्यांसाठी शासकीय ५०० निवासस्थाने बांधण्याचा निर्णय घेण्यात येणे. सदर निर्णयानुसार सद्य:स्थितीत सुमारे १०० च्यावर निवासस्थाने बांधून पूर्ण झाली असून देखील सदर निवासस्थाने वापराविना पडून असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री.रामनाथ मोते व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"शासनाने सन १९८७-८८ पासून अपंग शिक्षक-शिक्षकेत्तरांना वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे व्यवसाय करात सुट देण्याचा निर्णय घेतला असून सदर निर्णयाची अंमलबजावणी फक्त माध्यमिक शाळांसाठी होत असणे, शासनाच्या आदेशात प्राथमिक शाळांच्या नावाचा समावेश नसल्याने प्राथमिक शाळांमधील अपंग शिक्षक या योजनेच्या लाभापासून वंचित असून अपंग शिक्षकांवर शासनाकडून जाणीवपूर्वक अन्याय होत असणे, वारंवार विनंती करुनही शासनाने गेल्या २४ वर्षात अपंगांची प्राथमिक शिक्षण संचालनालयाने दखल न घेणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

# " राष्ट्रगीत ".

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १७ एप्रिल, २०१३.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.